तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet :http/www.dte.org.in

परिपत्रक

क्रमांक : 10/एडीएम/पदविका/पोस्ट एस.एस.सी./2016/ 692
दिनांक : 28 JUN 2016

विषय: महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे या मंडळा व्यतिरिक्त इतर मंडळातून इयत्ता 10 ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या समकक्षतेबाबत...

संदर्भ:- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, वाशी, नवी मुंबई यांचे संचालक, तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना दि. 13.6.2016 रोजी दिलेले पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये खालीलप्रमाणे सुचित केलेले आहे.

सी.बी.एस.ई. (CBSE), आय.सी.एस.ई. (ICSE), एन.आय.ओ.एस (NIOS), आय.जी.सी.एस.ई (IGCSE) व इतर मंडळातून 10 ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या तंत्रनिकेतनामध्ये अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमास प्रवेश दिल्यानंतर संबंधित तंत्रनिकेतनांतर्गत समकक्षतेबाबत एकत्रित प्रस्ताव विहीत शुल्क भरुन सादर केल्यास एकत्रित समकक्षता पत्र देण्यात येईल. सदरची वस्तूस्थिती विचारात घेऊन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे या मंडळाव्यतिरिक्त इतर मंडळातून 10 वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र पडताळणी सुविधा केंद्रावर करतेवेळी त्यांचेकडून समकक्षता प्रमाणपत्राऐवजी प्रवेशनंतर जर समकक्षता प्रमाणपत्र मिळाले नाही तर प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमास मिळालेला प्रवेश रदद झाल्यास त्याची कोणतीही तक्रार राहणार नाही तसेच त्यामुळे होणाऱ्या शैक्षणिक / आर्थिक नुकसानासाठी तो स्वत: जबाबदार राहील अशा प्रकारचे विद्यार्थ्यांने तसेच त्यांचे पालकाचे स्वाक्षरीचे हमीपत्र घ्यावे व त्यानुसार पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज सुविधा केंद्रानी स्वीकारुन त्यांना पोहच द्यावी. अशाच प्रकारचे विद्यार्थी व पालकांचे स्वाक्षरीचे हमीपत्र प्रवेश निश्चितीचे वेळी, प्रवेश निश्चित केंद्रावर (Admission Reporting Centre) तसेच संस्थेत प्रवेश घेतेवेळी सादर करावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.
2. सुविधा केंद्र प्रमुख, प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी पदविका सुविधा केंद्र
3. प्रणाली विश्लेषक, कार्यासन क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई. 4. निवड नस्ती

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई – ४०० ७०३.
M. S. Board Of Secondary And Higher SecondaryEducation,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

क्र.मुंविम/यो.प्र./ ५९६
वाशी,नवी मुंबई ४०० ७०३
दि. १३/०६/२०१६

प्रति,
संचालक
तंत्र शिक्षण मंडळ
(MSBTE)विभाग मुंबई,
बांन्द्रा (प.)

विषय – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , पुणे या मंडळा व्यतिरिक्त इतर मंडळातून इ.१०वी. च्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विदयार्थ्यांच्या समकक्षेतेविषयी...

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, CBSE, ICSE, NIOS,IGCSE व इतर मंडळातून इ.१०वी ची परीक्षा उत्तीर्ण होवून सदर विदयार्थी PolytechnicDiploma किंवा ITI साठी प्रवेश घेतात. समकक्षता पत्रासाठी मंडळ कार्यालयात मागणी करत असतात. आपल्या तंत्रशिक्षण मंडळा अंतर्गत संबंधित तंत्रशिक्षण महाविदयालयात प्रवेश दिल्यानंतर संबंधित तंत्रशिक्षण महाविदयालयाअंतर्गत समकक्षतेबाबत एकत्रित प्रस्ताव विहीत शुल्क भरून सादर केल्यास एकत्रित समकक्षता पत्र देण्यात येईल. तसेच आपल्या माहितीसाठी राज्य मंडळ, पुणे यांची समकक्षतायादीदेण्यात येत आहे. तसेच राज्य मंडळ, पुणे यांच्या www.mahahsscboardmaharashtra.gov.in या वेबसाईटवर ज्या मंडळांना समकक्षता दिलेली आहे. त्या मंडळाचे नाव सदर यादीत उपलब्ध आहे.

टिप:– आपल्या कार्यक्षेत्रातील तंत्रशिक्षण महाविदयालयांना कळविण्यात यावे.

(मि.या.चांदेकर)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ
वाशी, नवी मुंबई.४०० ७०३